# अमरावती महानगपालिका,अमरावती

## - आदेश पत्र -

क्रमांक ______ विभाग क्रमांक ______

स्थळ क्रमांक ______ पत्र क्रमांक ______

अर्जदाराचे नांव ______

| तारीख | | आदेश |
|---|---|---|
| | विषय :- वृक्ष प्राधिकरण सभेचे कार्यवृत्तांत<br><br>उपरोक्त संदर्भिय विषयानुसार मा. वृक्ष प्राधिकरण समिती सभा दि. 27/01/2026 रोजी स. 11.00 वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कार्यवृत्तांत तयार करण्यात आले असून आपले अवलोकनार्थ तथा स्वाक्षरीस सविनय सादर<br><br>मा. उद्यान अधिक्षक<br><br>मा. उपायुक्त (४)<br><br>स. उ. आयुक्त<br><br>- कार्यवृत्तांत स्वाक्षरीस्तव सादर.<br><br>3.2.26.<br><br>मा. आयुक्त. | |

उपायुक्त कार्यालय
विस/1421/2026
दिनांक 4-2-26

उद्यान विभाग कार्यालय
महानगर पालिका, अमरावती
जावक क्र. 1557/2-2-8-1-26

उपायुक्त-
क्र. 326 दि.
29 JAN 2026

उद्यान विभाग कार्यालय
महानगर पालिका, अमरावती
जावक क्र. 121 2-2-26

उद्यान विभाग कार्यालय
महानगर पालिका, अमरावती
जावक क्र. 1558 2-2-26

अतिरिक्त आयुक्त-२ कार्यालय
आ./ज. 925
दि. 02/02/2026

उद्यान विभाग कार्यालय
महानगर पालिका, अमरावती
जावक क्र. 1573 3-2-26

उद्यान विभाग कार्यालय
महानगर पालिका, अमरावती
जावक क्र. 655 दि. 4-2-26

## दिनाक २२.०१.२०२६ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तात

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा. आयुक्त यांचे कक्षा लगतच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक २२.०१.२०२६ रोजी स. ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा. आयुक्त ,महानगरपालिका, अमरावती

मा.अतिरिक्त आयुक्त (२), महानगरपालिका, अमरावती

मा.सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. १, महानगरपालिका, अमरावती

मा.सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र.२, महानगरपालिका, अमरावती

मा.सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ३, महानगरपालिका, अमरावती ( यांचे प्रतिनिधी )

मा.सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ४, महानगरपालिका, अमरावती

मा.सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ५, महानगरपालिका, अमरावती ( यांचे प्रतिनिधी )

मा.श्री. मधुकर घारड, वृक्ष तज्ञ, वनराई अमरावती

मा.श्री. अनिल घोम, वृक्ष तज्ञ, विद्यापीठ अमरावती

मा.श्री.विलास देशमुख,वृक्ष तज्ञ,अमरावती

उद्यान अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती

### दि.२२.०१.२०२६ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीचा कार्यवृतांत

### झोन क्र.१

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. अशोक नथ्थुजी महल्ले, अप्रतिम कॉलनी, जेल रोड, अमरावती | कडूनिम | ०२ | दि.२१/०१/२०२६ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता दोन कडुनिमाचे झाडांच्या फांद्या तोडण्याला परवानगी देण्यास हरकत नाही असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| २. | शहरी आरोग्य केंद्र क्र.७, विलास नगर, अमरावती | अशोका वृक्ष | ०२ | दि.०३/१२/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अशोकाचे वृक्ष म.न.पा. आरोग्य केंद्र, विलास नगर अम. येथे असुन हिरवेगार आहे. झाडाच्या खालच्या बाजुच्या फांद्या उद्यान अधिक्षक, मनपा द्वारे काढण्याला परवानगी देण्यास हरकत नाही असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | सौ. सुरेखा सुर्यकांत देशमुख, पाण्याची जवळ, अर्जुन नगर, अमरावती | साग-८२, इतर – ५५ वृक्ष | १३७ | दि.१२/१२/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर प्रक्षेत्रावर एकुण १७५ वृक्ष आहे. त्यापैकी ८२ साग, ५५ इतर झाडे यादीप्रमाणे असे एकुण १३७ झाडे परिपक्व काढावयाचे आहे. १७५-१३७ = ३८ झाडे शिल्लक ठेवावयाचे आहे.<br>१) साग – ८२ X २०००/- = १,६४,०००/-<br>2) इतर झाडे – ५५ X ६०००/- = ३,३०,०००/-<br>१३७ ४,९४,०००/-<br>-------------------------------------<br>-------- नियमाप्रमाणे मनपा खाती अनामत रक्कम रू.४,९४,०००/- जमा करून एकुण १३७ वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. | प्रथमतः वृत्तपत्रात प्रसिद्धी देवून हरकती मागविण्यात यावे तदनंतर परवानगी करीता प्रस्तावित करावे. |
| ४. | श्री. ऋषिकेश मनोहर बारब्दे, डॉ. बारब्दे हॉस्पीटल कॅम्प, अमरावती | कडूनिम | ०१ | दि.२१/०१/२०२६ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता कडुनिमाचे एक झाड नियमाप्रमाणे रू.६०००/- अनामत रक्कम घेवून परवानगी देण्यास हरकत नाही असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | अडचण ठरणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही. | नियमानुसार १:३ प्रमाणे ठेव रक्कम स्विकारून वृक्ष लावण्याचे अटीवर १ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ५. | श्रीमती वैशाली वा. किर्तकार, शोभा नगर, अमरावती | वकुळीचे झाड | ०२ | दि.०३/१२/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराच्या घरासमोर बाहेरील बाजुला दोन हिरवेगार वकुळाची झाडे आहेत. त्या झाडांच्या फांद्या छाटण्याची परवानगी नाकारण्यात यावी. त्या झाडांमुळे अर्जदाराला कुठलाही त्रास नाही असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्षामुळे अर्जदारास कुठलाही त्रास नाही. | वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ६. | श्री. एन. एच. शाह, परांजपे कॉलनी कॅम्प, अमरावती | शंखेश्वर | ०१ | सविनय फेर सादर करण्यात येते की, यापूर्वी अर्जदाराला मा.तांत्रिक सदस्य यांच्या पाहणी अहवालनूसार परवानगी प्रदान करण्यात आली होती. त्याअनुषंगाने अर्जदाराला अनामत रक्कम भरणेबावत पत्रव्यवहार करण्यात आला होता. अर्जदाराने कार्यालयाला विनंती अर्ज सादर केला. त्यानुसार शंकेश्वर वृक्ष अर्जदाराच्या घरापुढे नसुन श्री.लोटीया यांच्या प्रत्यक्ष घरासमोर आहे. सदरच्या झाडाच्या मुळा मुळे लगतची माझी कंपाउंड वॉलचा संपूर्ण भाग व आमच्या पाण्याचा टाका निकामी झाला आहे. कारण माझे घर हे श्री.लोटीया यांच्या घरापेक्षा ५-६ फुट खाली | सादर झाडाचे मुळे संरक्षित करता येते का तपासावे. अनामत रक्कम भरणा मध्ये सुट देण्यात येत नाही. | नियमानुसार ठेव रक्कम स्विकारून १:३ या प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | असल्यामुळे सद्यस्थितीत माझे खुप नुकसान झाले आहे. कंपाउंड वॉल व पाण्याचा टाका पुर्ववत करणेकरीता हजारो रूपयाचा खर्च मला करणे आवश्यक आहे. करीता वरील संपूर्ण बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करून व वरिष्ठ नागरीक या नात्याने आपणांस नम्र विनंती करतो की, आपण मला अनामत रक्कम भरणा मध्ये सुट द्यावी असे अर्जात नमुद आहे. सबब निर्णयार्थ सादर. | | |
| ७. | श्री. किरण रामदास पकडे, दळवी ले आऊट, सिध्दी विनायक नगर, अमरावती | कडूनिम | ०१ | सविनय फेर सादर करण्यात येते की, यापूर्वी अर्जदाराला मा.तांत्रिक सदस्य यांच्या पाहणी अहवालनूसार कडुनिम वृक्षाच्या फांद्या काढण्याची वैयक्तीक परवानगी प्रदान करण्यात आली होती. त्याअनुषंगाने अर्जदाराला फांद्या काढण्याची परवानगी बाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता. अर्जदाराने कार्यालयाला विनंती अर्ज सादर केला असुन कडूनिम वृक्ष सार्वजनिक ठिकाणी असल्यामुळे व वृक्षाच्या फांद्या विद्युत तारेत गेलेल्या असल्यामुळे स्वतः काढणे धोकादायक आहे तसेच वृक्षाच्या फांद्या शक्तीमान यंत्राद्वारे काढून देण्याची विनंती अर्जात नमुद केले आहे. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| ८. | सौ. मंगला अनीलराव वाढे, साईकृपा कॉम्प्युटर इंन्स्टिटयुट, लक्ष्मीनगर, अमरावती | सोनमोहर | ०१ | सविनय फेर सादर करण्यात येते की, यापूर्वी अर्जदाराला मा.तांत्रिक सदस्य यांच्या पाहणी अहवालनूसार सोनमोहर वृक्षाच्या फांद्या काढण्याची वैयक्तीक परवानगी प्रदान करण्यात आली होती. त्याअनुषंगाने अर्जदाराला फांद्या काढण्याची परवानगी बाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता. अर्जदाराने कार्यालयाला विनंती अर्ज सादर केला असुन सोनमोहर वृक्ष सार्वजनिक ठिकाणी असल्यामुळे व वृक्षाच्या फांद्या विद्युत तारेत गेलेल्या असल्यामुळे स्वतः काढणे धोकादायक आहे तसेच वृक्षाच्या फांद्या शक्तीमान यंत्राद्वारे काढून देण्याची विनंती अर्जात नमुद केले आहे. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |

# झोन क्र.२

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | डॉ.गणेश मा.काळे खापर्डे बगीचा अमरावती | सप्तपर्णी वृक्ष फांद्या | २ | दिनांक २९/१०/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.<br>अर्जदाराच्या परीसरा मधील सप्तपर्णी २ वृक्षाच्या खाली लोंबकलेल्या २-३इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात.उचित निर्णयास सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या लोंबकळलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| २ | श्री.दिपक सोनासा गुलालकरी रुईकर नगर ,अमरावती | बोर<br>बाभूळ फांद्या | १<br>१ | दिनांक २९/१०/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.<br>अर्जदाराचे रिकाम्या प्लॉट मध्ये बोरीचे व बाभूळीचे २ वृक्ष वाढलेली आहे,वृक्ष हिरवीगार आहे.अर्जदाराला बांधकाम करावयाचे असल्याचे सांगण्यात आले.सबब बांधकाम परवानगी घेतल्या नंतर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.तूर्त परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास सादर. | बांधकाम परवानगी नंतर प्रकरण सादर करावे. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ३ | श्री .सुबोध मोरेश्वर सहत्रबुद्धे जनार्दन पेठ ,अमरावती. | गुलमोहर वृक्ष फांद्या | १ | दिनांक २९/१०/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.<br>गुलमोहर वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेलाछान वाढलेला व हिरवागार आहे.रस्त्याकडे झुकलेल्या फांद्या उद्यान विभागाने यापूर्वीच काढलेल्या दिसून आल्या,सबब फांद्या काढण्याचे कार्यास कार्योतर मान्यता देण्यात यावी.उचित निर्णयास सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. |
| ४ | श्री.धनंजय हिंमतराव खंडारे टोपे नगर,अमरावती | सुबाभूळ<br>निलगिरी फांद्या | १<br>१ | दिनांक २९/१०/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.<br>अर्जदार प्रतिभा हाउसिंग सोसाईटी चे फ्लॅट मध्ये राहतात.टॅक्स पावती त्यांचे नावे दिसून आली नाही. विविध प्रजातीची वृक्ष सदर प्रतिभा हाउसिंग सोसायटीचे परिसरात दिसून आली ,अर्जदाराला सोसायटी परिसरात एकून किती वृक्ष आहेत याची यादी सादर करण्यास सांगितले .(फोटोसह) तसे वृक्ष तोडणे /वृक्षाच्या फांद्या तोडण्यासाठी सोसायटीच्या अध्यक्ष /सचिव अर्ज करण्यास सूचना दिल्या .अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदाराला ४-६ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास सादर. | वृक्षाच्या फोटोसह अर्ज सादर करण्याच्या सूचना देण्यात याव्या. | वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ५ | सौ.रमा अशोक देशभ्रतार राजापेठ | कडूनिंब<br>इंग्रजी चिंच<br>सुबाभूळ | १<br>१<br>१ | दिनांक २९/१०/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.<br>अर्जदार शासकीय जागेवर अतिक्रमण करून राहतात असे दिसून आले.एका बाजूला रेल्वेची जागा(रेल्वेलाईन)व | झाडाच्या मालकि हक्काबाबत दस्तावेज सादर | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.वृक्षाला इजा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पोलीस स्टेशन कार्टर च्या मागे ,अमरावती | फांद्या | | सा.बा विभागाची पोलीस ठाणे राजापेठ शासकीय जागेवर आहे.वृक्षाचा व अर्जदाराचा काहीही संबंध नाही.सबब मालकी हक्का बाबत दस्तावेजसादर करण्यास सांगावे.तूर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.वृक्षाला इजा पोहचवू नये,असे सूचित करण्यात यावे.उचित निर्णयास सादर | करण्याच्या सूचना देण्यात याव्या. | पोहचवू नये,असे सूचित करण्यात यावे. |
| ६ | श्री.संजय केशवराव नागपुरे केशर अपार्टमेंट,बडनेरा रोड,अमरावती<br>तक्रारकर्ते | जांभूळ<br>उंबर<br>सप्तपर्णी<br>अवैध वृक्ष तोड | १<br>१<br>१ | दिनांक २९/१०/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. बडनेरा रोड वरील केशर अपार्टमेंट येथील अवैध वृक्षतोड झाल्याची तक्रार अपार्टमेंटमधिल फ्लॅट धारक श्री संजय नागपुरे यांनी केल्याचे दिसुन आले. तक्रारीचे वाचन केले पाहणी दरम्यान तोडलेल्या तीन वृक्षाची खोडे जमीनीपासुन ६ ते १० इंच ठेवलेली दिसुन आले.<br>A)केशर अपार्टमेंट ईमारत व मंदिर संस्थानची ईमारत या दोन ईमारतीमधिल खुल्या जागेत असलेली जांभुळ, सप्तीपर्णी व उंबर वृक्ष तीन वृक्ष अंदाजे सात ते आठ वर्षाचे असावी. सदर वृक्ष गैरअर्जदार श्री विजय सारडा व श्री मनिष तिवारी यांनी तोडल्याचे तक्रार अर्जात नमुद आहे. दोन्ही व्यक्ती हजर होते. त्यांची प्रत्यक्ष भेट झाली त्यांनी विचारल्यावरुन सांगीतले की विपारी कीडे, उंदीर व साप आमचे फ्लॅट मध्ये खिडकी मधुन येतात त्यांचा त्रास असल्याने वृक्षतोड केली आहे असे त्यांनी कबुल केले.<br>B)गैरअर्जदार व अर्जदार यांच्यात आपसी वाद असल्याचे हि दिसुन आले.<br>C) गैरअर्जदार यांना दि. १४/१०/२०२५ दिलेल्या नोटिसनुसार त्यांनी सादर केलेला दि. २७/१०/२०२५ रोजीचा खुलासा वाचण्यात आला.<br>D) गैरअर्जदार यांनी खुलाशात व प्रत्यक्ष भेटित वृक्षतोड केल्याचे कबुल केले आहे. करीता नागरीक्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियमानुसार दंडात्मक कार्यवाही / पर्यायी वृक्ष लागवड करण्याचे सुचित करण्यात यावे.<br>E)गैरअर्जदाराचा खुलासा अमान्य करण्यात यावा.<br>F)वृक्षाचे वय लक्ष्यात घेता गैरअर्जदारांना प्रती वृक्ष ५०००/- ( पाच हजार रुपये ) दंड ( ५०००x३=१५०००/-) या प्रमाणे १५०००/- रुपये दंड आकारण्यात यावा. तसेच पर्यायी वृक्ष लागवड अपार्टमेंट परीसरात स्थानिक प्रजातीची करण्याचे सुचित करण्यात यावे. | सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या अवैधपणे वृक्ष तोड झाल्याचे दिसून आले आहे. | खुलासा अमान्य करण्यात येत आहे.अवैधपणे वृक्ष तोडल्याबाबत अवैध वृक्षतोड बाबतचे धोरणाचे अधीन राहून २०,०००/- रु.प्रती वृक्ष या प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. |
| ७ | डॉ.मिलिंद्र वा.जगताप दरोगा प्लॉट ,अमरावती | कडूनिंब<br>पेल्ट्रोफार्म<br>आकाश नीम<br>अवैध वृक्ष तोड | १<br>१<br>२ | दि.१३/१०/२०२५ रोजी वृक्ष अधिकार्यांना मिळालेल्या सूचनेनुसार दरोगा प्लॉट परिसरात अवैध वृक्ष तोड झाल्याची माहिती प्राप्त झाली.त्यानुषंगाने वृक्ष अधिकारी कार्यालयाच्या वतीने दि.१३/१०/२०२५ रोजी स्थळ निरीक्षण करून अहवाल देण्यात आल्याचे दिसून आले.त्या अहवाला वरून गैर अर्जदार श्री.मिलिंद जगताप यांनी सार्वजनिक रस्त्यावरील छान वाढलेला व हिरवागार चार वृक्षाची १ कडूनिंब ,२ आकाश निम(बुच) | सदर प्रकरणी वृक्षाच्या फांद्या अवैधपणे वृक्ष तोड झाल्याचे दिसून आले आहे. | खुलासा अमान्य करण्यात येत आहे.अवैधपणे वृक्ष तोडल्याबाबत अवैध वृक्षतोड बाबतचे धोरणाचे अधीन राहून २०,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वृक्ष व १ पेल्ट्रोफार्म वृक्ष असे एकून ४ वृक्षाची विना परवानगी मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड केल्याचे स्पष्ट झाले.त्यानुसार गैरअर्जदार यास नोटीस देण्यात आली व त्यांचा खुलासा प्राप्त झाल्याचे दिसून आले.<br>उपरोक्त अनुषंगाने दि .२९/१०/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण करण्यात आले व खुलासा वाचण्यात आला.गैर अर्जदाराने सार्वजनिक रस्त्यावरील चार मोठी वाढलेली (३० फुटा पेक्षा जास्त उंचीची) वृक्ष बेमुर्तपणे तोडून टाकलेली दिसून आली.१ कडूनिंब वृक्षाचे खोड जमिनी पासून १० फुट उंच शिल्लक ठेवले त्याची गोलाई ९० से.मी एवढी आहे ,२ आकाशनीम(बुच) वृक्षाचे खोड जमिनी पासून ७-९ फुट उंच आहे गोलाई अनुक्रमे १४५ व १४० से.मी एवढी आहे,१ पेल्ट्रोफार्म वृक्षाची जमिनी पासून ठेवलेल्या खोडाची उंची ४ फुट शिल्लक ठेवली आहे.खोडाची गोलाई १३४ से.मी आहे.गैरअर्जदाराने लाकडाची विल्हेवाट लावल्याचे दिसून आले.<br>सबब गैरअर्जदार श्री.मिलिंद जगताप यांनी त्यांचे घराला लागून असलेल्या सार्वजनिक रस्त्यावरील छान वाढलेल्या वृक्षाची विना परवानगी बेमुर्तपणे कत्तल केली हे सिद्ध होते करीता नागरीक्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ नुसार प्रती वृक्ष १५,०००/- रुपये पंधरा हजार रुपये प्रमाणे(१५,००० x ४=६०,००० रुपये) (साठ हजार रुपये)दंड आकारण्यात यावा व श्री.जगताप यांचा खुलासा अमान्य करण्यात यावा.<br>PART- 2<br>सदर प्रकरणी प्राप्त खुलासा नुसार व संबंधित कागदपत्रे पाहिल्या नंतर असे निर्देशनास आले कि,गैर अर्जदार व इतर नागरिकांनी विहित नमुन्यात अर्ज व वृक्षाचे फोटो टक्स पावती इतर कागदपत्रे जोडून उद्यान विभागात दि.१८/०७/२०२५ रोजी अर्ज दिल्याचे छायांकित प्रत दिसून आले.उद्यान विभागाने दि १८/०७/२०२५ पासून आज पर्यंत सदर अर्जावर काय कारवाई केली याचा अहवाल उद्यान अधीक्षका कडून घेणे गरजेचे आहे.वास्तविक पाहता नियमानुसार वृक्ष तोड/फांद्या तोड/याबाबतचे अर्ज संबंधित झोन चे वृक्ष अधिकारी कडे पाठविणे आवश्यक असते.अर्ज दिल्याचे तारखे पासून ४५ दिवसाचे आत कार्यवाही न झाल्यास डीमस परमिशन होते असे गृहीत धरल्या जात असते.उचित निर्णयास सादर. | | रु.प्रती वृक्ष या प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. |
| ८ | श्री .जयंत शेषरांवजी हुशंगाबादे रा.गणेश कॉलोनी अमरावती | पाम वृक्ष | १ | आज दिनांक.२०/११/२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला .<br>अर्जदाराने त्यांचे घरा समोरील रस्त्याच्या कडेला पामची पाच वृक्ष लावलेली आहेत, त्यापैकी चार वृक्ष सलग लावण्यात आले असून जवळ जवळ असल्याचे दिसून येते. सबब एक वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात हरकत नाही.उचित निर्णयास सादर . | सदर वृक्ष प्रत्यारोपण करण्याचे प्रयत्न करावे. | प्रथम सदर वृक्ष काढून दुसऱ्या जागेवर लावणे शक्य असल्यास ते पाहावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मा.मुख्याध्यापक<br>श्री.शिवाजी मराठा हायस्कूल ,स्टे.ब्रांच अमरावती | गुलमोहर<br>पिंपळ<br>सुबाभूळ<br>बादाम<br>सिंगापुरी कापोक | २<br>१<br>१<br>१<br>१ | आज दिनांक २०/११/२५ रोजी प्रत्यक्ष स्तर निरीक्षण केले असता खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला आहे.<br>अर्जदार यांच्या शाळेच्या परिसरात विविध प्रजातीची २०हून अधिक वृक्ष छान वाढलेली व हिरवीगार असून परिसर हिरवा केलेला आहे .अर्जदाराला विद्यमान वृक्षापैकी दोन गुलमोहर एक पिंपळ एक सुबाभूळ एक बदाम व एक सिंगापुरी कापोक वृक्षाच्या ७-८ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास सादर . | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या ७-८ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| १० | श्री.प्रल्हाद गोविंद वर्हाडे रा.टोपे नगर ,अमरावती | कडूनिंब | १ | आज दिनांक २०/११/२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला आहे .<br>कडुनिंब वृक्ष अर्जदाराचे राहत्या घरात वाढलेला असून झाडामुळे घराची भिंत क्रॅक झाली व पडली आहे करीता वृक्ष काढणे गरजेचे आहे नियमानुसार ठेव स्वीकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. | अडचण ठरणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही. | नियमानुसार १:३ प्रमाणे ठेव रक्कम स्विकारून वृक्ष लावण्याचे अटीवर १ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ११ | उपमंडल अभियंता (बॅटरी /पा.प्लांट/इमारत ) बि.एस.एन.एल श्याम चौक अमरावती | अशोक वृक्ष | ९ | आज दिनांक २०/११/२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला आहे .<br>उपमंडळ अभियंता बी.एस.एन.एल, श्याम चौक, अमरावती येथील कार्यालयाचे परिसरात अशोकाची ९ वृक्ष छान वाढलेली व हिरवीगार आहेत. कार्यालयाच्या इमारतीकडे झुकलेल्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची (वृक्ष क्र.३ ,६ व ९ )यांच्या परवानगी देण्यास हरकत नाही. फांद्या काढताना वृक्षाचा तोल बिघडणार ,नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात . उचित निर्णयास सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| १२ | अनिता भुजाडे 19 नंबर शाळेजवळ रुक्मिणी नगर अमरावती | आंबा वृक्ष<br>अशोक वृक्ष | ३ | आज दिनांक 15 /12 /2025 रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराचे घराचे आवारात दोन आंबा व एक अशोका वृक्ष छान वाढलेली हिरवीगार आहेत. वृक्ष सरळ वाढलेली आहे शेजा-यांच्या घराकडे व रस्त्यावर कचरा पडतो म्हणून वृक्षतोड करायची असल्याचे सांगण्यात आले आहे. सबब नमूद कारणासाठी वृक्ष काढण्याची परवानगी देता येणार नाही. वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी, व वृक्षाला कोणत्याही प्रकारे इजा पोहचू नये असे सूचित करण्यात यावे.<br>2) अर्जदारांकडून मालकी हक्काची कागदपत्रे घेण्यात यावी टॅक्स पावती दुसऱ्याचे नावावर व अर्जदार वेगळेच आहेत. तसेच वृक्षाचे कलर फोटो नियमानुसार लावण्याची सुचित करण्यात यावे. वरील प्रमाणे कागदपत्रे लावण्यात यावीत उचित निर्णयास सादर | वृक्ष काढण्याची परवानगी अर्जदाराकडून करण्यास सूचित करावे. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| १३ | धनंजय भुजाडे रा- हमालपूरा अमरावती | पिंपळ वृक्ष | १ | आज दिनांक 15 /12/ 2025 रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता स्थानिक हमालपुरा परिसरात पिंपळ वृक्ष फार मोठा वाढला असून तीन मोठया फांद्या तीन दिशांनी गेले आहेत.वृक्ष अत्यंत दाटीदाटीने घरे असलेल्या जागेत आहे. त्यावर पावसाळ्यात वीज पडल्याने वृक्षाचा मोठा भाग वाळलेला आहे. सबब वृक्षाच्या वाळलेल्या फांद्या काढून टाकण्याची तसेच विद्युत तारेवर झुकलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या काढण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सदर पिंपळ वृक्षाचे फांद्या अतिशय धोकादाय परिस्थितीत असल्यामुळे ते कधीही तुटून पडू शकतात व कुठलीही जीवित हानी होऊ शकते. या अनुषंगाने सदर वृक्षाच्या फांद्या तोडण्याची परवानगी जा. क्रमांक 869/2026 दिनांक 6 /1 /2026 रोजी देण्यात आली आहे माहिती सादर. | | |
| १४ | अजय कमल किशोर राठी बुटी प्लॉट राजापेठ अमरावती | काशिद वृक्ष (अवैध वृक्ष तोड ) | ३ | दिनांक 02/ 12 /2025 रोजी निवावी प्राप्त तक्रारीनुसार कॅम्प परिसरातील डी मार्ट च्या बाजूला स्थळ निरीक्षण केले असता खुला प्लॉटमधील तीन कशीद प्रजातीचे हिरवीगार वृक्षांची अवैध वृक्षतोड झाल्याचे निदर्शनास आले असुन सदर प्लॉट मालक श्री अजय कमल किशोर राठी यांना जा. क्रमांक 868 दिनांक 6 /1/ 2026 रोजी अवैध वृक्षतोडीबाबत नोटीस देण्यात आली आहे. पुढील कारवाई करता उचित निर्णयात सादर | नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी. | अवैधवृक्ष तोड प्रकरणी प्रति वृक्ष २०,०००/- रु.प्रमाणे दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. |
| १५ | उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक- २ अमरावती | कडुनिंब वृक्ष | १ | श्याम नगर परिसरात सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक २ यांचे वतीने नालीचे बांधकाम सुरू असल्याचे दिसून आले खोदण्यासाठी जे.सी.बी. चा वापर केल्याने एक कडूनिंब वृक्ष छान वाढलेला हिरवीगार असलेला जेसीबी चे खोदकामामुळे त्यांच्या मुळा उघडलेल्या अवस्थेत आहे. वृक्ष श्री यादव यांच्या घराच्या कडेला झुकलेला आहे. वृक्ष केव्हाही पडू शकतो संबंधित अभियंतांनी वृक्ष त्वरित काढण्याची कारवाई करावी. नियमानुसार ठेव स्वीकारून बदली वृक्ष लावायचे अटीवर परवानगी देण्यास हरकत नाही उचित निर्णयास सादर | सदर विभागास अवैध वृक्ष तोड बाबत नोटीस देण्यात यावी. नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी. | अवैधवृक्ष तोड प्रकरणी प्रति वृक्ष २०,०००/- रु.प्रमाणे दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. |

## झोन क्र.३

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | डॉ.उज्वल इंगोले रा.कॉग्रेस नगर रोड अम. | कडूबदाम | १ | दि.११/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अर्जदार यांचे दवाखान्यासमोरील रोडच्या बाजूला कडूबदाम झाड आहे.काही फांद्या दवाखान्या कडे झुकलेल्या आहेत.वृक्षाखाली पेशंट व लहान मुळे बसलेली असतात.करिता दवाखान्याकडील २-४ इंच व्यासाच्या अडचणीच्या फांद्या कापण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| २ | श्री.अभिलाष शिरभाते रा.प्रमोद कॉलोनी अम. | कडूनिंब | १ | दि.११/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अर्जदार यांचे घरामागील सार्वजनिक रोड च्या बाजूला मोठे कडूनिंब चे झाड आहे.त्याच्या काही फांद्या विद्युत वाहिनीवर गेलेल्या आहेत.करिता विद्युत वाहिनीवर गेलेल्या फांद्या उद्यान विभागाकडून तोडून देण्याची परवानगी | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या २-४ इंच फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | | येत आहे. |
| ३ | श्री.उत्तमराव राव रा.शांती नगर,अम. | कडूनिंब<br>पिंपळ | १<br>१ | दि.११/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता, अर्जदार यांचे घरासमोर सार्वजनिक जागेवर कडूनिंब व पिंपळ वृक्ष एकत्र वाढलेली आहेत.त्याच्या काही फांद्या विद्युत वाहिनीवर गेलेल्या आहेत. आहेत. सदर वृक्षाच्या २-४ इंच व्यामाच्या रोडवरील व विद्युत तारेंवरील फांद्या उद्यान विभागामार्फत तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या २-४ इंच फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| ४ | श्री.अजय बैतुले रा.पूजा कॉलोनी | कडूनिंब | १ | दि.११/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता, अर्जदार यांचे घरावाहेर रोड च्या वाजूला कडूनिंब झाड छान वाढलेले आहे.त्याच्या दोन फांद्या विद्युत तारेंवर तिरप्या पसरलेल्या आहेत. सदर वृक्षाच्या ४-६ इंच व्यासाच्या रोडवरील व विद्युत तारेंवरील फांद्या उद्यान विभागामार्फत तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या २-४ इंच फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| ५ | श्री.दिलीपराव नागापुरे रा.वडाळी | भिंगरी | १ | दि.११/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अर्जदार यांचे घराच्या आवारात भिंगरीचे मोठे वृक्ष आहे.झाड एका वाजूला झुकलेले आहे.झाडाच्या खाली घरे आहेत.घरावर फांदी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही करिता झुकलेल्या ४-६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास्तव सादर | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या घराकडे झुकलेल्या २-४ इंच फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| ६ | श्री.गजानन चापके रा.न्यू कॉलोंनी | सागवान | १ | दि.११/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अर्जदाराच्या घराच्या आवारात भिंतीला लागून एक परीपक्व ७०-८० से.मी.व्यासाचे सागवान वृक्ष वाढलेला आहे.वृक्षामुळे कम्पाउंड भिंत तडकत आहे तसेच जमिनीकडील भाग वर आला आहे.वृक्ष परीपक्व असल्यामुळे सागवान धोरणानुसार एक सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | सागवान धोरणानुसार वृक्ष काढण्यास हरकत नाही. | परीपक्व असलेले १ सागवान वृक्ष नियमानुसार १:१ प्रमाणे ठेव रक्कम स्वीकारून बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ७ | श्री.मोबीन खान अध्यक्ष – कब्रस्थान फ्रेजरपुरा अम. | चिंच | २ | दि.११/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,फ्रेजरपुरा कब्रस्थान मधील २ चिंचेची मोठी वृक्ष पूर्ण तोडण्याची परवानगी मागितली आहे.सादर वृक्षाजवळ म.न.पा द्वारे बांधकाम करणार आहे असे अर्जदार यांनी सांगितले.दोन्ही झाडे मध्य भागी पोकळ असली तरी वृक्ष चांगली वाढलेली व सुस्थितीत आहे. म.न.पा कडून नक्की काय व कुठे बांधकाम करणार आहे याचा मंजूर नकाशा अर्जासोबत जोडला नाही.त्यामुळे प्रत्यक्ष बांधकामाचा नकाशा आल्यावर निर्णय घेणे शक्य होईल.करिता प्रकरण स्थगित ठेवण्यात यावे. उचित | बांधकामामध्ये येणारे वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.बांधकामात येणारे वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निर्णयास्तव सादर. | | |
| ८ | श्री अनिल वाळके रा.जलाराम नगर अम. | आंबा | १ | दि.११/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अर्जदाराच्या घराच्या आवारात आंब्याचे झाड छान वाढलेले असून सुस्थितीत आहे.अर्जदाराला काहीही अडचण होत नाही.करिता वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.उचित निर्णयास्तव सादर. | वृक्ष छान व हिरवेगार असल्याने काढता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ९ | श्री.विजय खंडेलवाल रा.न्यू कॉंग्रेस नगर अम. | अशोक | | दि.२६/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अर्जदार यांच्या घराच्या आवारात ७ अशोकाची वृक्ष छान वाढलेली आहेत.तसेच सार्वजनिक जागेवर एक मोठे इंग्रजी चिंच वृक्ष आहे.अर्जदार यांना वास्तुशास्त्रानुसार कम्पाऊड चे मोठे गेट मध्यभागी करावयाचे आहे.चर्चेदरम्यान त्यांनी अशोकाची ४ मोठी वृक्ष तोडण्याची परवानगी मागितली असून इतरही झाडांच्या फांद्या कापण्याची परवानगी मागितली आहे.करिता मोठे गेट दुसरीकडे करण्याकरिता मागितलेली वृक्ष तोड परवानगी नाकारण्यात यावी.तसेच इंग्रजी चिंच वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास्तव सादर. | वृक्ष छान व हिरवेगार असल्याने काढता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.इंग्रजी वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| १० | श्री.राजेंद्र ढोले रा.अंबिका नगर,अम. | कॅशिया | १ | दि.२६/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अंबिका नगर येथे गणेश मंदिराचे सभामंडपाचे काम मा.आमदार श्री रवी राणा यांच्या निधी मधून करावयाचे आहे असे अर्जात नमूद आहे.त्या जागेत एक कॅशिया वृक्ष वय अंदाजे ५ते ६ वर्ष बांधकामाकरिता अडचण ठरत आहे.परंतु अर्जासोबत बांधकाम परवानगी,मंजूर नकाशा जोडला नाही आहे.करिता अर्जदार यांच्याशी चर्चेदरम्यान बांधकाम परवानगी व नकाशा सादर केल्यानंतर वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | वृक्ष छान व हिरवेगार असल्याने काढता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ११ | श्रीमती मंजिरी देशपांडे रा.किरण नगर अम. | कडूनिंब | १ | दि.२६/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अर्जदाराच्या घराच्या खुल्या आवारात कम्पाऊड लागून कडूनिंब चे वृक्ष छान वाढलेले आहे.त्याच्या काही फांद्या घरावर व विद्युत तारांवर आलेल्या आहेत.करिता ४-६ इंच व्यासाच्या फांद्या वृक्षाचा समतोल राखून कापण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या २-४ इंच फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| १२ | श्री.मनोहर पाटील रा. वडाळी | कडूनिंब | १ | दि.२६/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अर्जदाराच्या घराच्या आवारात एक कडूनिंब मोठे चे वृक्ष छान वाढलेले आहे.काही फांद्या अस्तव्यस्त व विद्युत तारांवर वाढलेल्या आहेत.करिता ३-५ इंच व्यासाच्या फांद्या कापण्याची | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या २-४ इंच फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | परवानगी देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास्तव सादर. | | परवानगी देण्यात येत आहे. |
| १३ | श्री.अरविंद लोखंडे रा.वनश्री कॉलोनी | कॅशिया<br>कडूनिंब | १<br>१ | दि.२६/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता, अर्जदार यांचे घराबाहेर रोड च्या बाजूला १ कडूनिंब व १ कॅशिया वृक्ष छान वाढलेला आहे.कशिया वृक्ष फार वाढलेला असून झाडाचे खोड कम्पाऊड ला टेकल्यामुळे कम्पाऊड पडले आहे.दोन्ही वृक्ष खूप मोठी व अस्तव्यस्त वाढलेली असून त्याखालून विद्युत तार गेलेले आहेत.कशिया वृक्षाची एक मोठी फांदी वृक्षावर अडकलेली आहे कधीही पडून अपघात होऊ शकतो.करिता उद्यान विभागाकडून दोन्ही वृक्षाची आवश्यकतेनुसार त्वरित छाटणी करणे आवश्यक असल्याने समतोल फांद्या त्वरित काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या २-४ इंच फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| १४ | श्री.अनिल सावदेकर रा.जीवनज्योती कॉलोंनी अम. | कॅशिया | ४ | दि.२६/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अर्जदार यांच्या घरासमोर रोडलगत सार्वजनिक जागेवर ४ मोठे कॅशिया वृक्ष छान वाढलेली आहेत.त्या सर्व वृक्षाच्या मोठ्या फांद्या विद्युत वाहिनीवर झुकलेल्या आहेत.फांद्या विद्युत वाहिनीवर पडून अपघात होऊ शकतो.करिता उद्यान विभागामार्फत ४-६ इंच व्यासाच्या फांद्या त्वरित काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या २-४ इंच फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| १५ | श्री.अनिकेत मिश्रा रा.प्रसाद कॉलोनी | कडूबदाम | १ | दि.२६/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता, अर्जदाराच्या घरामागील सार्वजनिक उद्यान मधील कडूबदाम वृक्ष मोठ्या प्रमाणात वाढलेली आहेत.त्याच्या फांद्या रहिवाशी घरावर पसरलेल्या आहेत.त्यामुळे अडचणी निर्माण होत आहे. करिता अडचणीच्या घरावर आलेल्या फांद्या उद्यान विभागामार्फत कापण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.उचित निर्णयास्तव सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नसावी. | वृक्षाच्या घरावर झुकलेल्या २-४ इंच फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे. |
| १६ | श्री.विवेक देशमुख सहा.अभियंता मनपा अम. | कडूनिंब | १ | दि.२६/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,मनपा द्वारे महालक्ष्मि नगर ते कैलाश नगर ला जोडणाऱ्या पुलाचे बांधकाम सुरु आहे.पुलाचा स्लॅब पूर्ण झाला आहे.पुलाखालून पाण्याचा प्रवाह नेण्याकरिता एक कडूनिंब चे वृक्ष प्रवाहाच्या मधात येत आहे.सदर वृक्षाची दोनदा पाहणी केली परंतु माहिती देण्याकरिता अभियंता/कंत्राटदार उपस्थित नव्हते.करिता कडूनिंब वृक्ष वय अंदाजे १० वर्ष स्थलांतरित होऊ शकते.त्यामुळे ते वृक्ष अर्जदाराने jcb च्या सहाय्याने स्थलांतरित करावे अशी शिफारस करण्यात येत आहे. उचित निर्णयास्तव सादर. | सदर वृक्ष प्रत्यारोपण करण्याचे प्रयत्न करावे. | प्रथम सदर वृक्ष काढून दुसऱ्या जागेवर लावणे शक्य असल्यास ते पाहावे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | श्री.संजय सरोदे रा.बेनोडा | बेल | १ | दि.२६/११/२५ रोजी प्रत्यक्ष वृक्षाची पाहणी केली असता,अर्जदाराच्या घरालगत नझुलच्या जागेवर मंदिर असून मंदिरासमोर एक बेलाचे वृक्ष छान वाढलेले व हिरवेगार आहे.अर्जदाराच्या म्हणण्यानुसार मंदिरासमोर सरकारी निधीतून शेड उभारायचे आहे.अर्जाला बांधकाम नकाशा परवानगी काहीच जोडली नाही तसेच बेल वृक्षाची फार अडचण दिसून आली नाही.करिता वृक्ष कापण्याची परवानगी नाकारण्यात यावी.उचित निर्णयास्तव सादर. | वृक्ष छान व हिरवेगार असल्याने काढता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| १८ | प्राचार्य – श्रीमती नरसम्मा महाविद्यालय,किरण नगर अमरावती. | विनापरवानगी वृक्ष तोडल्या बाबत | | सदर प्रकरणात प्राचार्य – श्रीमती नरसम्मा महाविद्यालय,किरण नगर अमरावती.यांना वृक्ष प्राधिकरण सभा दि. १६/१०/२५ रोजीच्या सभेतील ठराव क्र.१० नुसार विनापरवानगी ९ विविध वृक्ष विनापरवानगी तोडल्याबाबत १,८०,००० रुपये (एक लक्ष अंशी हजार रुपये )दंड करण्यात आला होता.त्या दंडात्मक नोटीस वर सदर संस्थेने मनपा ने आकारलेला दंड रद्द करण्यावाबत अर्ज केला केला आहे.त्यामध्ये त्यांनी विकास कामाकरिता क्रेनद्वारे बिल्डींग वर लोखंडी फरलीन टाकण्याकरिता वृक्षाची अडचण येत असल्याने परिसरातील लहानमोठे वृक्ष काढणे गरजेचे होते.आम्ही जाणूनबुजून वृक्ष तोडली नाही.आम्हाला दंडात्मक कारवाही म्हणून झाडाच्या बदल्यात आणखी झाड लावण्याबाबत वाटले होते.परंतु आपण प्रत्येक झाडामागे २०,००० रुपये दंड आकारलेला आहे.करिता आपण आकारलेला दंडा ऐवजी वृक्ष लावण्याचा दंड करण्यात यावा ही विनती. उचित निर्णयास्तव सादर. | नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी. | अवैधवृक्ष तोड प्रकरणी प्रति वृक्ष २०,०००/- रु.प्रमाणे दंड कायम ठेवून कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे. |

## झोन क्र.४

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सौ.मेघा सुरेश वनसोड. रा.अलंकार पार्क, नवीवस्ती,वडनेरा | कडूनिंब | १ | दि.१३/११/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- अर्जदाराचा खुला प्लॉट आहे त्यांना घराचे बांधकाम करावयाचे आहे. शेजारी असलेल्या लगतच्या प्लॉटमध्ये मंदिर असून मंदिरातील कडूनिंब वृक्ष सदर अर्जदाराच्या प्लॉटकडे झुकलेल्या आहे.बांधकाम परवानगी घेतल्यानंतर वृक्ष तोडण्याची/वृक्षाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यावाबत विचार करता येईल,तूर्त परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा पोचवू नये असे | वृक्ष छान व हिरवेगार असल्याने फांद्या काढता येणार नाही. | वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सूचित करावे.<br>अहवालानूसार फांद्या काढण्याची तूर्त परवानगी नाकारण्याकरिता सादर. | | |
| २ | गैरअर्जदार श्रीमती मीना बंकटलाल पांडे रा.साईनगर, अमरावती | कडूनिंब | १ | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल**:- सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार यांनी सार्वजनिक जागेवरील कडूनिंब वृक्षाच्या फांद्या मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या तोडल्याबाबत या कार्यालयाचे जा.क्र.अमनपा/द.प्र./स.आ./४९२६/२५ दि.१०/११/२०२५ रोजीच्या खुलासाची नोटीस देण्यात आली आहे. त्यानुसार गैरअर्जदार यांनी दि.१४/११/२०२५ रोजी खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलासावर मा.तांत्रिक सदस्य यांचे अहवाल खालीलप्रमाणे आहे.<br>तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-<br>१) आज दि.२७/११/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले .<br>२) दि.१०/११/२०२५ रोजी वृक्ष अधिकारी तथा सहा.आयुक्त बडनेरा झोन यांनी गैरअर्जदारास दिलेली नोटीस बघितली.<br>३) गैरअर्जदार यांनी दि.१४/११/२०२५ रोजी दिलेला खुलासा वाचण्यात आला. गैरअर्जदाराने सार्वजनिक जागेवरील रस्त्याचे कडेला,छान वाढलेला,हिरवागार,कडूनिंब वृक्षाची बेमुर्वतपणे तोड केली असून फक्त खोड शिल्लक असल्याचे दिसून आले. सबब गैर अर्जदाराला नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ नुसार ५०००/- (पाच हजार रुपये ) दंड आकारण्यात यावा व गैरअर्जदाराचा खुलासा अमान्य करण्यात यावा तसेच उर्वरित वृक्षाची देखभाल करण्याचे सूचित करण्यात यावे.<br>सदर अहवाल माहितीस व पुढील कार्यवाहीस सादर. | खुलासा अमान्य करण्यात येत आहे. | अवैधपणे झाडाच्या तोडल्यामुळे प्रति वृक्ष ५०००/- रु.दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| ३ | तक्रारदार श्री.परिक्षीत दिवाकर कातखेडे रा.गोपाल नगर, अमरावती | निलगुंडी | १ | वृक्ष अधिकारी यांचा अहवाल:-दि.१७/१०/२५ रोजीचे सभेमध्ये दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तावित वृक्षाचा gps lattitude व longitude चे फोटो सादर केलेले आहे.तसेच वृक्षगणना करण्यात आलेले ornet कंपनी कडून वृक्षाचे फोटोसुद्धा सादर केलेले आहे.<br>सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार १) श्री.संजय हरडे २)श्री.सुर्यकांत बोबडे ३) प्रवीण अलटकर रा. गोपाल नगर यांना प्राप्त तक्रारीनुसार अवैध वृक्षतोड केल्याबाबत या कार्यालयाचे जा.क्र.४५११ दि.०६/१०/२०२५ रोजीचे खुलासाचे पत्र देण्यात आले होते.त्यानुसार गैरअर्जदारांनी या कार्यालयात दि.०८/१०/२०२५ रोजी खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलासावर मा.तांत्रिक सदस्य यांचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.<br>दि.१५/१०/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>तांत्रिक सदस्यांचा अहवाल:- काढण्यात आलेला वृक्ष वाळलेला होता असे दिसूल आले त्याची तक्रार गैरअर्जदारांनी पूर्वीच विद्युत विभागाकडे केली होती असे दिसून आले. कोणतीही अवैध वृक्षतोड झालेली दिसून येत नाही शेजारी वाद आढळून आला सबब प्रकरण नस्ती करण्यात यावे. | सदर ठिकाणी चौकशी केली असता, सदर वृक्ष आधीच वाळलेला दिसून आला आहे.कुठलीही अवैध वृक्ष तोड झाल्याचे दिसून येत नाही. | सदर प्रकरण नस्ती बंद करण्यात यावे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सदर अहवाल आपल्या माहितीस व उचित निर्णयास सादर. | | |
| ४ | विजय हनुमान मंदिर तर्फे श्री.सुनील भगवानदास शर्मा' माळीपुरा,नवीवस्ती, बडनेरा. | शिसम | १ | **तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-** दि.२७/११/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.विजय हनुमान मंदिर माळीपुरा नवीवस्ती बडनेरा येथील सार्वजनिक जागेवर हनुमानजीचे जुने मंदिर आहे त्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे तेथील नागरिकांनी ठरविले असल्याचे सांगण्यात आले. सदर जीर्णोद्धार बांधकाम मा.आमदार श्री.रवी राणा यांच्या निधीतून मंजूर असून काम सुरु झाल्याचे दिसून आले प्रत्यक्ष बांधकामात येणारा एक शिसम वृक्ष काढण्याची परवानगी नियमानुसार देण्यास हरकत नाही. इतर वृक्षांना इजा पोहचू नये असे सूचित करण्यात यावे.<br>**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल:-** सदर वृक्ष तोडण्याची पूर्व परवानगीस मा.आयुक्त महोदया यांनी दि.२८/११/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे त्यानुसार संबंधित अर्जदारास या कार्यालयाचे जा.क्र.५२४२ दि.०३/१२/२०२५ अन्वये १ शिसम वृक्ष काढण्याची परवानगीचे पत्र देण्यात आले आहे.<br>**अहवालानूसार शिसम वृक्ष काढण्याची परवानगी कार्योत्तर मंजुरीकरिता सविनय सादर.** | प्रत्यक्ष बांधकामात येणारा एक शिसम वृक्ष काढण्याची परवानगी नियमानुसार देण्यास हरकत नाही. | नियमानुसार १:३ प्रमाणे ठेव रक्कम स्विकारून वृक्ष लावण्याचे अटीवर १ वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. |
| ५ | गैरअर्जदार श्री.शेषराव वापूराव गोयटे रा.बनारसे इंडस्ट्रीज,जवेरी नर्सरी अमरावती रोड,अमरावती | गुलमोहर १<br>अशोका ३<br>कडुबदाम १ | ५ | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल:-** गैरअर्जदारांना या कार्यालयाचे जा.क्र.५२४३दि.०३/१२/२०२५ रोजी अवैधरीत्या ५ वृक्षांची मोठ्या प्रमाणात छाटणी केल्याबाबत खुलासाचे पत्र देण्यात आले.त्यानुसार गैरअर्जदारांनी या कार्यालायात दि.०८/१२/२०२५ रोजी खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलासावर मा.तांत्रिक सदस्य यांचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल:-** आज दि.१२/१२/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केले.अर्जदाराचा मालकीचा परिसर ४ एकर पर्यंत असल्याचे सांगण्यात आले त्यांचे परिसरात विविध प्रजातीचे अंदाजे १०० पेक्षा अधिक वृक्ष असल्याचे दिसून आले. गैरअर्जदाराने १ गुलमोहर वृक्ष,अशोका ३ वृक्ष व १ कडूबदाम वृक्ष (सार्वजनिक रस्त्यावरील) अश्या एकूण ५ वृक्षाची छाटणी केल्याचे दिसून आले.त्यापैकी गुलमोहर वृक्ष बुडातून किडलेला व एकीकडे झुकलेला आढळला त्याच्या फांद्या काढण्यात आले आहे. तसेच इतर ४ वृक्षांच्या फांद्या काढण्यात आल्याचे दिसून आले, गैरअर्जदाराशी चर्चा केली असता सदर परिसर त्यांच्या मालकीचा असून | नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी. | अवैधवृक्ष तोड प्रकरणी प्रति वृक्ष २०,०००/- रु.प्रमाणे दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे. |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td></td>
<td></td>
<td>ते स्वतः वृक्षप्रेमी असल्याचे दिसून आले.<br>सबब गैरअर्जदारास जमीन मालकी हक्काचा पुरावा तसेच त्यांचे परिसरात असलेल्या एकूण वृक्षाची माहिती खालील तक्तानुसार मागविण्यात यावी. माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करणे उचित ठरेल.<br><table><tr><th>अ. क्र</th><th>वृक्ष क्र</th><th>वृक्षाचे नाव</th><th>वृक्षाचे वय</th><th>वृक्षाची उंची</th><th>वृक्षाचा घेरा</th></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr></table>सदर अहवाल आपल्या माहितीस व उचित निर्णयार्थ सादर</td>
<td></td>
<td></td>
</tr>
<tr>
<td>६</td>
<td>श्री.रवींद्र तांबेकर, सहा.अभियंता, दक्षिण प्रभाग क्र.४, बडनेरा</td>
<td>बेल १<br>कडूनिंब १</td>
<td>२</td>
<td>तांत्रिक सदस्यांचा अहवाल:- आज दि.१२/१२/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता बडनेरा येथील पवन नगर मध्ये यवतमाळ रोड पर्यंत कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम सुरु आहे. त्यामध्ये २ वृक्ष आहेत ज्यामध्ये<br>(१) कडूनिंब जो रस्त्याच्या काठावर असल्यामुळे त्याला पूर्णपणे कापण्याची आवश्यकता नाही फक्त १ मोठी फांदी उत्तरेकडील ८ इंच व्यासाची काढण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी. रस्ता बांधकाम करतांना सदर वृक्षाच्या जमिनीलगत ६ इंच जागा मोकळी ( outer ring ) सोडावी खोडापर्यंत कॉंक्रीटकरण करण्यात येऊ नये.<br>(२) बेलाचा वृक्ष अंदाजे ५ वर्षे उंची १२ ते १३ फुट जो रस्त्याच्या २-३ फुट मध्ये येत आहे शेजारी मंदिर असल्यामुळे नागरिकांनी लावला असून तेथे पूजा करण्यातयेत असल्याचे दिसते. करिता सबब बेल वृक्ष उद्यान विभागामार्फत शेजारी खुल्या जागेत स्थानांतरीत करण्यात यावा,जर स्थानांतरण करणे शक्य नसेल तर त्याबदल्यात नियमाप्रमाणे ३ बदली वृक्ष शाखा अभियंता यांनी लागवड करण्याच्या अटीवर बेल वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी.<br>अहवालानुसार कडूनिंब वृक्षाची फांदी व बेल वृक्ष काढण्याची परवानगी मंजुरीकरिता सादर.</td>
<td>सदर वृक्ष प्रत्यारोपण करण्याचे प्रयत्न करावे.</td>
<td>प्रथम सदर वृक्ष काढून दुसऱ्या जागेवर लावणे शक्य असल्यास ते पाहावे.</td>
</tr>
<tr>
<td>७</td>
<td>श्री.रवींद्र तांबेकर, सहा.अभियंता, दक्षिण प्रभाग क्र.४ बडनेरा</td>
<td>गुलमोहर</td>
<td>२</td>
<td>तांत्रिक सदस्यांचा अहवाल:- आज दि.१८/१२/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केले. सदर परिसर जुना जकात नाका कोंडेश्वर रोडवर असून सदर परिसरात शेकडो वृक्ष आहेत मोकाट कुत्र्यांच्या निवाऱ्यासाठी बांधकाम करायचे असल्याचे सांगण्यात आले.तथापि कुठे बांधकाम करायचे आहे याबाबत संबंधित कर्मचारी ( श्री.अमोल ) सांगू शकले नाही त्यांनी तांबेकर</td>
<td>बांधकामाबाबत माहिती सादर करण्यास सूचित करावे.</td>
<td>सदर प्रकरण पुढील माहिती सह पुढील सभेमध्ये सादर करावे.</td>
</tr>
</table>

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | साहेबांना माहिती असल्याचे सांगितले बांधकाम नकाशा उपलब्ध नसल्याने कोणते वृक्ष काढायचे आहेत याबाबत माहिती प्राप्त झाल्यानंतर विचार करता येईल तूर्त प्रकरण स्थगित ठेवण्यात यावे.<br>अहवालानूसार वृक्ष तोडण्याची परवानगी तूर्त नाकारण्याकरिता सादर. | | |
| ८ | श्री.अनिल तोताडे रा.सुदामा कॉलोनी ,साईनगर, अमरावती. | कडूनिंब | १ | तांत्रिक सदस्यांचा अहवाल:- आज दि.१८/१२/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केले.कडूनिंब वृक्ष सार्वजनिक रस्त्यावर असून छान वाढलेला व हिरवागार आहे, वृक्षाच्या मोठ्या फांद्या पूर्वीच काढण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराचे घरापासून वृक्षाचे अंतर बरेच आहे सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी व वृक्षाला इजा पोचवू नये असे आदेशित करण्यात यावे.<br>अहवालानूसार वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्याकरिता सादर. | वृक्ष छान व हिरवेगार असल्याने काढता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ९ | श्री.राहुल ह. अडवाणी रा. सातुर्णा,साई नगर, अमरावती | पेस्टो फोरम | १ | तांत्रिक सदस्यांचा अहवाल:- आज दि.१८/१२/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केले. पेस्टोफोरम वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला महामार्गावर छान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराचा अर्ध्या एकर प्लॉट आहे त्यांना बांधकाम करावयाचे आहे असे सांगण्यात आहे तथापि वृक्ष अर्जदाराचे प्लॉटपासून बऱ्याच अंतरावर आहे कोणतीही अडचण नाही तसेच अर्जदाराला कोणत्याही प्रकारची बांधकामाची परवानगी मिळालेली नाही.<br>सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी, सार्वजनिक रस्त्यावर असलेल्या सदर वृक्षाला इजा पोचवू नये असे सूचित करण्यात यावे.<br>अहवालानूसार वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्याकरिता सादर. | वृक्ष छान व हिरवेगार असल्याने काढता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| १० | मुख्याधापक , हॉलीक्रॉस हायस्कूल, नवीवस्ती,वडनेरा | भिंगरी वाळलेला | १ | तांत्रिक सदस्यांचा अहवाल:- आज दि.२०/०१/२०२६ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केले.भिंगरी वृक्ष हॉलीक्रॉस हायस्कूल,नवीवस्ती,वडनेरा शाळेच्या परिसरात असून वृक्ष संपूर्ण वाळलेला आहे. १ बदली वृक्ष त्याच जागेवर लावण्याचे सूचित करावे, वृक्ष काढण्याची परवानगी त्वरित देण्यात यावी.<br>अहवालानूसार वाळलेला वृक्ष तोडण्याची परवानगी मंजुरीकरिता सादर. | वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नसावी. | एक बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वाळलेला एक वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ११ | श्री.राजेशसिंह कुशवाहा, आय.आय.एम.सी.ली.अमरावती. | विविध प्रजातीचे | १३ | तांत्रिक सदस्यांचा अहवाल:- आज दि.२०/०१/२०२६ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केले.केंद्र सरकारचा मास कमुनिकेशन आय.आय.एम.सी.ली. ईमारतीचे बांधकाम अंदाजे दोन एकर जागेवर सुरु असून संपूर्ण जागेला कंपाऊंड | प्रकरण पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे. | प्रथमतः वृत्तपत्रात प्रसिद्धी देवून हरकती मागविण्यात यावे तदनंतर परवानगी करीता प्रस्तावित |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वाल केलेली आहे. या संपूर्ण परिसरात एकूण विविध प्रजातीचे १६ वृक्ष आहेत ज्यात ( ५ कडूनिंब ,५ सिसम,बोर१,भिंगरी वृक्ष २ व नंबरीग न केलेले ३ कडूनिंब ) त्यापैकी १३ वृक्ष काढण्याची परवानगी अर्जदारांनी मागितलेली आहे. परिसरात असलेल्या संपूर्ण वृक्षांची यादी विहित नमुन्यात मागविण्यात यावी तसेच अर्जदाराने मंजूर नकाशात प्रत्यक्ष बांधकामात येणारी वृक्ष लाल रंगाने व राखावयाची हिरव्या रंगाने चिन्हांकित करून सादर करावी उपरोक्त माहिती प्राप्त झाल्यांनतर प्रत्यक्ष बांधकामात येणारी वृक्ष काढण्याची परवानगी नियमानुसार देण्यास हरकत नाही. तूर्त परवानगी नाकारण्यात यावी.<br>**वृक्ष अधिकारी यांचा अहवाल:-** वरीलप्रमाणे अर्जदाराने मंजूर नकाश्यात चिन्हाकित करून वृक्षांची यादी विहित नमुन्यात सादर केलेली आहे सदर यादीनुसार वृक्ष क्र.१ ते १३ काढण्याची परवानगी मागीतेलेली आहे तसेच वृक्ष क्र.१४ ते १६ राखावयाची आहे.<br>अहवालानूसार वृक्ष काढण्याची परवानगी मंजुरीकरिता सादर. | | करावे. |

## झोन क्र.५

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उप अभियंता झोन करा.5 मनपा अमरावती | बेल वृक्ष<br>आंवा वृक्ष<br>कडूनिंब | १<br>१<br>२ | आज दि.१२/११/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले गडगडेश्वर रोडवर दोन्ही बाजूला RRC नालीचे बांधकाम सुरु आहे नालीच्या उजव्या बाजूला (श्री. घोरमाडे) यांचे घरासमोरील १ बेल वृक्ष १ आंवा वृक्ष व (श्री.नळे) यांचे घरासमोर असलेले १ कडूनिंब व एक वृक्ष नाली बांधकामात येत असल्याचे दिसून आले वृक्ष काढण्याकरिता नाली बांधकाम होऊ शकत नाही. तसेच डाव्या बाजूला मनपा खाली जागेवरील कडूनिंब त्याच्या दुसऱ्या एकीकडे लोखंडी पोल येतो काढणे अवघड आहे.<br>मवव १ आंवा १ बेल व २ कडूनिंब वृक्ष एकुण चार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात हरकत नसावी. | वृक्ष काढण्यास हरकत नाही.सदर काम मनपाचे असल्याने ठेव रक्कम पासून सूट देण्यास हरकत नाही.वृक्ष लागवडीचा अहवाल उप अभियंता यांनी सादर करावा. | विशेष बाब म्हणून ठेव रक्कमेतून सूट देण्यात येत असून १:५ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ०४ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| २ | श्री.मुकुंद केशवराव | कडूनिंब वृक्ष | १ | दि.०५/०१/२०२६ रोजी प्रत्येक स्थळ निरीक्षण केले कडूनिंब वृक्ष अर्जाराच्या कंपाऊंड वाल मध्ये व अर्धा | वाळलेला वृक्ष काढण्याची परवानगी | एक बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वाळलेला एक वृक्ष |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वितोंडे रा.न्यु संगाणी नगर अमरावती | | | बाहेर असुन वृक्ष संपूर्ण वाळलेले आहे. अर्जदाराला नियमानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात हरकत नाही.<br>परवानगी देण्यात आली कार्यउत्तर मंजुरीस सादर. | देण्यास हरकत नसावी. | काढण्याची कार्योत्तर मंजुरी प्रदान्न करण्यात येत आहे. |

## निर्देश :-

१.सर्व झोन वृक्ष अधिकारी यांनी अनामत रक्कम व प्रलंबित अवैधवृक्ष दंडाबाबत उद्यान विभागाकडे माहिती सादर करणे

२. उद्यान विभागाने पुढील सभेमध्ये अमरावती वन विभागाचे अधिकारी यांना बोलवावे.

३.सर्व झोन वृक्ष अधिकारी यांनी परवानगी दिलेली वृक्षे ऑनलाइन Greenamravati.com या पोर्टलवर अद्यावत करावे.

४.तांत्रिक सदस्य यांनी भरपाई वृक्षां रोपना बाबत धोरण सभेमध्ये ठेवण्यात यावे.

५.उद्यान विभागाने वृक्ष गणना कंपनीला प्रत्येक सभेमध्ये हजर राहणे बाबत सूचित करावे व त्यांना संबंधित झोन मधील वृक्ष अधिकारी यांचेशी संपर्क साधून ऑनलाइन पोर्टल बाबत एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करून देण्या करिता सूचित करावे.

६.उद्यान विभागाने वृक्ष कापणे व फांद्या बाबतच्या नमुना प्रपत्र सादर करावा.

७.वृक्ष कापणे बाबत जाहिरात देणे करिता वृक्ष अधिकारी यांनी जनसंपर्क अधिकारी व संगणक विभागाशी संपर्क साधून अमरावती महापालिकेच्या संकेतस्थळा वर पब्लिश करून आक्षेप व हरकती मागविण्यात याव्या.

८.उद्यान विभाग व तांत्रिक सदस्य यांनी झाडांची CATEGORY निश्चित करून त्यावर आकारण्यात येणारा दंडाबाबत धोरण पुढील सभेमध्ये सादर करावे.

९. तांत्रिक सदस्य यांनी वृक्ष प्रत्यारोपणा बाबत माहिती घेऊन पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावे.

आयुक्त
महानगरपालिका, अमरावती